# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### ममदापुर (ता.येवला,जि.नाशिक) संवर्धन राखीव क्षेत्रात संशोधन केंद्र मंजूर करण्याबाबत

**(१) ६७३२ (२५-०३-२०२६) श्री.पंकज भुजबळ, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ममदापुर (ता.येवला,जि.नाशिक) संवर्धन राखीव क्षेत्रात राज्यामध्ये नामशेष होणाऱ्या काळवीट प्रजातीच्या संवर्धनासाठी काळवीट अपंगालय तसेच गवती रोपवाटीकेचा विस्तार करून संशोधन केंद्र मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ममदापुर संवर्धन राखीव येथे काळवीट अपंगालय, वनपर्यटनाला चालना मिळण्यासाठी ममदापुर किंवा देवदरी येथे वन उद्यान विकसित करणे तसेच ममदापुर संवर्धन राखीव क्षेत्रातील गवती रोपवाटिकेचा विस्तार करुन संशोधन केंद्र स्थापन करणेबाबत जागा निवडीचे काम व DPR तयार करण्याच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, ममदापुर (ता.येवला,जि.नाशिक) संवर्धन राखीव क्षेत्रातील राज्यामध्ये नामशेष होणाऱ्या काळवीट प्रजातीच्या संवर्धनासाठी काळवीट अपंगालय तसेच गवती रोपवाटीकेचा विस्तार करून संशोधन केंद्र मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२७-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) ममदापूर (ता.येवला, जि.नाशिक) संवर्धन राखीव क्षेत्रातील देवदरी येथे वनउद्यान विकसीत करणे आणि क्षेत्रामध्ये काळवीट अपंगालय तसेच गवती रोपवाटिकेचा विस्तार करुन संशोधन केंद्र मंजूर करणेकामी योग्य त्या स्थळाची पाहणी करुन संबंधित सहाय्यक वनसंरक्षक, वनीकरण व वन्यजीव संरक्षण, मनमाड यांचेमार्फत परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्यास अनुसरून संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी, येवला प्रादेशिक यांनी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालास अनुसरून नाशिक वनविभागाकडून खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

• ममदापूर संवर्धन राखीव येथे काळवीट अपंगालय, वनपर्यटनाला चालना मिळण्यासाठी ममदापूर किंवा

देवदरी येथे वनउद्यान विकसीत करणे तसेच ममदापूर संवर्धन राखीव क्षेत्रातील गवती रोपवाटिकेचा विस्तार करून संशोधन केंद्र स्थापन करणेबाबत या तीन बाबींसाठी जागा निवडीचे काम पूर्ण झालेले आहे.

• मौजे-देवदरी, ता.येवला येथे वनउद्यान विकसीत करणेबाबत डिपीआर तयार करण्यात आलेला आहे. सदर डिपीआर ला व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांची अंतिम मंजुरी प्राप्त झालेली असून, कामनिहाय सविस्तर अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही सद्य:स्थितीत प्रगतीपथावर असून विषयांकित प्रकरणी लवकरात लवकरच राज्य योजना व जिल्हा वार्षिक योजना मधील वनक्षेत्रात पर्यटन स्थळांचा विकास करणेबाबतची बाब प्रगतीपथावर आहे.

• ममदापूर संवर्धन राखीव क्षेत्र, ता.येवला राज्य योजना वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना करणे (२४०६ २२३२) व जिल्हा वार्षिक योजना बिगर आदिवासी उपयोजना (२४०६-बी१०९) अंतर्गत बिबट व इतर वन्यप्राण्यांसाठी अपंगालयाच्या अनुषंगिक कामांच्या प्रस्तावास मंजुरी प्राप्त झालेली असून, सदर कामाची निविदा प्रगतीपथावर आहे.

• ममदापूर क्षेत्रातील गवत रोपवाटिकेचा विस्तार करून संशोधन केंद्र स्थापन करणे राज्य योजना गवती कुरणाचा विकास करणे (२४०६-०५१४) अंतर्गत सदर ठिकाणी संशोधन केंद्र स्थापन करणेबाबत डिपीआर बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुदानित आदिवासी आश्रम शाळेतील माध्यमिक शिक्षकांना ग्रेड वेतन ४८०० रुपये लागू करण्याबाबत

**(२) ६८२४ (२५-०३-२०२६) श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभाग नागपूर यांच्या कायक्षेत्रातील प्रकल्प गडचिरोली व देवरी येथील शासकीय आश्रमशाळेतील माध्यमिक शिक्षकांना एकस्तर पदोन्नती अंतर्गत ग्रेड वेतन ४८०० रुपये लागू करण्यात आले असून अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांना एकस्तर पदोन्नती अंतर्गत ग्रेड वेतन ४८०० रुपये लागू करण्याबाबत प्रकल्प कार्यालय हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकस्तर पदोन्नती अंतर्गत ग्रेड वेतन ४८०० रुपये लागू करण्याच्याबाबत वारंवार संघटनांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनुदानित आश्रमशाळेतील माध्यमिक शिक्षकांना माध्यमिक मुख्याध्यापकाची मूळ वेतन श्रेणी ग्रेड वेतन ४८०० रुपये लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (२७-०३-२०२६) :** (१), (२) व (३) एकस्तर पदोन्नती अंतर्गत ग्रेड वेतन ४८०० रुपये लागू करण्याच्या मागणीबाबत वारंवार संघटनांकडून मागणी होत असल्याची बाब खरी आहे. त्यानुषंगाने सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक २९/०२/२०२४ मधील निर्देशानुसार अनुदानित आश्रमशाळांमधील माध्यमिक शिक्षकांना एकस्तर पदोन्नती योजना अंतर्गत ग्रेड वेतन ४८००/- लाभ

देण्याची कार्यवाही प्रकल्प अधिकारी, देवरी व प्रकल्प अधिकारी, गडचिरोली यांचेकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## राज्यातील खाजगी अनुदानित निवासी आदिवासी आश्रम शाळांमध्ये परिचारिकेचे पद उपलब्ध करून देणेबाबत

**(३) ६८५५ (२५-०३-२०२६) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील खाजगी निवासी अनुदानित आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी आजारपणाच्या कालावधीत उपचाराकरीता नर्स (परिचारिका) चे पद उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी आश्रम शाळा निवासी असल्यामुळे व बऱ्याच शाळा ह्या ग्रामीण दुर्गम भागात असून त्या ठिकाणी विद्यार्थी आजारी पडल्यास त्यांना वेळेवर उपचार मिळण्याकरीता अशा ठिकाणी निवासी नर्स शाळेमध्ये असणे अत्यावश्यक आहे परंतु या शाळांमध्ये नर्सेस उपलब्ध नसून याकरीता कोणत्याही स्वरूपाचे अनुदान शाळांना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आदिवासी निवासी अनुदानित आश्रम शाळांमध्ये नर्स उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके (२७-०३-२०२६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

आदिवासी विकास विभागांतर्गत अनुदानित आश्रमशाळांमध्ये स्वतंत्रपणे नर्स (परिचारीका) पद मंजूर नाही. तथापि, विद्यार्थी आजारी पडल्यावर प्राथमिक स्वरूपाची काळजी संबंधित कर्मचाऱ्यांच्याकडून घेतली जाते. तसेच आवश्यकतेनुसार नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालय किंवा जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात येते.

तसेच नजीकचे प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण चे रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी हे वेळोवेळी भेट देऊन विद्यार्थ्यांची तपासणी करतात.
(३) अनुदानित आश्रमशाळेकरीता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध निश्चित करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरू असून त्यामध्ये प्रत्येक आश्रमशाळेकरीता नर्सचे पद प्रस्तावित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील पात्र झोपडपटटीधारकांच्या पुनर्वसनासाठी तीन पर्यायी भूखंड शोधण्याचे निर्देश दिल्याबाबत

**(४) ६८७४ (२५-०३-२०२६) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमणकर्त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मागील २४ वर्षांपासून शासन स्तरावर त्याच स्थीतीत आजपर्यंत प्रलंबित असून संजय गांधी राष्ट्रीय उद्यान (एसजीएनपी) परिसरातील अतिक्रमण करुन वसलेल्या रहिवासी व गाळेधारकांपैकी पात्र झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनासाठी किमान ९० एकर क्षेत्रफळाचे तीन पर्यायी भूखंड शोधण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने राज्य शासनास माहे नोव्हेंबर,२०२५ मध्ये वा त्या सुमारास दिले असून पालघर जिल्ह्यातील केळवे गावातील जमीन मूलभूत सुविधा उपलब्ध असल्याने योग्य असल्याचे सांगण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसजीएनपी परिसरातील अतिक्रमणे हटवणे आणि पुढील अतिक्रमणे रोखणे असे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर निर्देशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय, तसेच उपरोक्त प्रकरणी शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२७-०४-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) जनहित याचिका क्र.४८/२०२३ व रिट याचिका क्र.३०५/१९९५ मधील अवमान याचिका क्र.९२३७/२०२३ मध्ये दिनांक १६/१०/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीअंती मा.उच्च न्यायालयाने आदेश पारीत केले आहेत. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान या अमुल्य ठेव्याचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी उद्यानातील पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसनाची प्रक्रिया सुलभ करुन उद्यानाचे संरक्षण करण्याकरीता उपाययोजना सुचविण्याच्या उद्देशानने मा.उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त मुख्य न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आली आहे. मा.उच्च न्यायालयाद्वारे स्थापित उच्चाधिकार समितीच्या निर्देशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अतिक्रमणांबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## वडगाव मावळ (जि.पुणे) तहसिल कार्यालयात प्रलंबित असलेले कुणबी दाखले त्वरीत देण्याबाबत

**(५) ६८९३ (२५-०३-२०२६) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ तालुक्यातील (जि.पुणे) अनेक गावांतील नागरिकांनी कुणबी दाखल्यांसाठी वडगाव मावळ तहसिल कार्यालयात अर्ज दाखल केले असून नागरिकांना वारंवार तहसिल कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या

लागत असून तालुका प्रशासनाकडून गावनिहाय कुणबी नोंदींच्या याद्या प्रसिध्द केल्या जातील असे सांगूनदेखील प्रत्यक्षात मागील काही महिन्यांपासून दाखल्यांच्या नस्त्या नागरी सुविधा केंद्रात प्रलंबित असल्याची तक्रार नागरिकांकडून होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भूमि अभिलेख कार्यालयात उपलब्ध असलेल्या जुन्या दस्ताऐवजांवर आधारित वंशावळ तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण न झाल्यास कुणबी प्रमाणपत्र मिळणे कठीण होत असून या दिरंगाईमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याने पालकांसमोर मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कुणबी दाखले त्वरीत देण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२८-०४-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.

कुणबी प्रमाणपत्राच्या संदर्भात अखंड मराठा समाज, महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा यांच्यावतीने दिनांक १९ सप्टेंबर, २०२५ व दिनांक ९/१२/२०२५ रोजी तहसिलदार, मावळ यांना निवेदन प्राप्त झाले.
(२) व (३) अखंड मराठा समाज, महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा यांच्या निवेदनातील मागण्यांच्या अनुषंगाने अखंड मराठा समाजाचे प्रतिनिधींसमवेत सर्व संबंधित अधिकारी यांची दिनांक २६/०९/२०२५ रोजी तहसिलदार, मावळ यांच्यांकडे बैठक घेण्यात आली. त्यानुसार मोडी भाषेतील दस्तऐवजांचा मराठी भाषेमध्ये रुपांतरीत करुन मराठी भाषेतील याद्या सर्व संबंधित गावांमध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्या.

तसेच मावळ तालुक्यामध्ये कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीच्या नोंदी ग्राम स्तरावर प्रसिध्द करण्यात आल्या असून सदरच्या नोंदी एनआयसी (NIC) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २५/०१/२०२४ च्या शासन निर्णयानुसार तालुका स्तरावर कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रासंदर्भात वंशावळ जुळविण्यासाठी दिनांक १२/०७/२०२४ रोजी तहसिलदार, मावळ यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून मावळ तालुक्यामध्ये माहे ऑक्टोबर, २०२३ पासून एकूण १३८७ जात दाखले मंजूर करण्यात आले असून ९ जातीचे दाखले नामंजूर करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाडा विभागात वनक्षेत्रावरील अतिक्रमण हटविण्याबाबत

**(६) ७०६६ (२५-०३-२०२६) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा विभागात वनक्षेत्र झपाट्याने कमी होत असून दोन दशकात मोठ्या प्रमाणावर वन जमिनीवर अतिक्रमण झाल्याने सुमारे ८३६६ हेक्टर वनक्षेत्रावरील अतिक्रमण हटवण्यासाठी वन विभागाने कडक कारवाईचा निर्णय घेतला असल्याची बाब माहे डिसेंबर,२०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास

निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन जमिनीवर शेती, बांधकामे,गोठे व वीट भट्ट्यांचां व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू असून सन २००४ पासून वन जमिनीवरील अतिक्रमणाच्या प्रकरणाबाबत राज्य शासनाने अतिक्रमण हटवण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास या अनुषंगाने शासनाने वन जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (१०-०६-२०२६) :** (१), (२) व (३) छत्रपती संभाजीनगर वनवृत्त अंतर्गत सुमारे ८७८९. हे.आर वनक्षेत्रावर अतिक्रमण होते. सदरचे अतिक्रमण हे शेती व बांधकामा करीता केलेले होते. त्यापैकी सुमारे १३३३.०६ हे.आर वनक्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासित करण्यात आलेले आहे.

उर्वरीत अतिक्रमण वनहक्क अधिनियम २००६ अन्वये मंजूर, प्रलंबित व नामंजूर दाव्याबाबत चौकशी करून, विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून निष्कासित करण्याची कार्यवाही संबंधित उप वनसंरक्षक व विभागीय वन अधिकारी यांचेकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळेतील अधीक्षक संवर्गात पदोन्नती मध्ये अन्याय होत असल्याबाबत

**(७) ७३०० (२५-०३-२०२६) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागातंर्गत येणाऱ्या शासकीय आश्रमशाळांमध्ये वसतिगृह अधीक्षक हे एकलपद असून शासन अधिसूचना दिनांक ७ जानेवारी, २००४ अन्वये नव्याने निर्माण करण्यात आले असून सदर अधिसूचनेनुसार अधीक्षक पदावर सलग तीन वर्षे सेवा पूर्ण केलेल्या व एम.एस.डब्ल्यु अर्हता धारण केलेल्या व्यक्तीस पदोन्नती देणेबाबत तरतूद केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गृहपाल पदाची भरती नामनिर्देशाने २५ टक्के आणि अधीक्षक पदामधून पदोन्नतीमधून ७५ टक्के कपाती तरतूद असून दिनांक १२ जून, २००७ च्या अधिसूचनेनुसार त्यामध्ये बदल करण्यात आला असल्याने गृहपाल पदावर नामनिर्देशनाने ७५ टक्के आणि अधीक्षक संवर्गातून २५ टक्के असे उलट प्रमाण करण्यात आले आहे त्यामुळे अधीक्षक संवर्गावर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने फेरनिर्णय घेवून शासन निर्णय दिनांक ७ जानेवारी, २००४ प्रमाणे पदोन्नतीचे प्रमाण कायम ठेवणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (१८-०५-२०२६) :** (१), (२) व (३) शासकीय वसतिगृहातील गृहपाल (पुरुष) गट "ब", गृहपाल (स्त्री) गट-"ब" आणि शासकीय आश्रमशाळेतील अधीक्षक (पुरुष) गट "क", अधीक्षक (स्त्री) गट-"क", पदाचे मूळ सेवाप्रवेश नियम दिनांक ०७/०१/२००४ रोजी अधिसूचीत करण्यात आले आहे. सदरहू मूळ सेवाप्रवेश नियमानुसार अधीक्षक (पुरुष) / अधीक्षक (स्त्री) पदावर सलग तीन वर्ष सेवा पूर्ण केलेल्या व अतांत्रिक शाखेतील पदवी, शिक्षण शास्त्रातील पदवी किंवा शासनाने समकक्ष म्हणून केलेली अन्य अर्हता धारणा करणाऱ्या उमेदवारांमधून, ज्यष्ठतेच्या आधारे पात्रतेच्या अधिन राहून गृहपाल (स्त्री) / गृहपाल (पुरुष) पदावर पदोन्नती देण्याची तरतूद होती. मूळ सेवाप्रवेश नियमात नामनिर्देशन व पदोन्नतीचे प्रमाण अनुक्रमे २५:७५ इतके होते.

सदरहू मूळ सेवाप्रवेश नियमात दिनांक १०/०१/२००६ रोजी सुधारणा करुन अधीक्षक (पुरुष) / अधीक्षक (स्त्री) पदासाठी शैक्षणिक अर्हता एम.एस.डब्ल्यु. केली. तत्कालीन परिस्थिती विचारात घेता मूळ सेवाप्रवेश नियमात दिनांक १२/०६/२००७ रोजीच्या अधिसूचनेन्वये पदोन्नतीच्या प्रमाणात सूधारणा करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेन्वये नामनिर्देशन व पदोन्नतीचे प्रमाण अनुक्रमे ७५:२५ इतके केले.

दिनांक १६/११/२०२२ रोजी क्षेत्रिय कार्यालयाचा सुधारीत आकृतिबंध निश्चित करण्यात आला आहे. दिनांक ०९/०९/२०२१ रोजीच्या सेवाप्रवेश नियमाच्या आदर्श नमुन्यानुसार गृहपाल (स्त्री)/(पुरुष) व अधीक्षक (स्त्री)/(पुरुष) संवर्गाची एकूण मंजूर पदे विचारात घेऊन, सेवाप्रवेश नियमामध्ये पदोन्नतीने व नामनिर्देशनाने नियुक्तीचे प्रमाण सुधारीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना जिल्ह्यात बहुतांशी गावातील पर्जन्यमान यंत्रे नविन बसविण्याबाबत

**(८) ७३१३ (२५-०३-२०२६) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात बहुतांशी गावातील पर्जन्यमान यंत्रे ना दुरुस्त असल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देताना चुकीची नोंद घेतली जात असल्याने अनेक शेतकरी मदतीपासून वंचित रहात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन ना दुरुस्त असलेले पर्जन्यमान यंत्र दुरुस्त करण्याबाबत व नविन पर्जन्यमान यंत्रे बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दत्तात्रय भरणे (०९-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) महावेध प्रकल्पांतर्गत सद्य:स्थितीत एकूण ४९ स्वयंचलित हवामान केंद्रे उभारण्यात आलेली असून स्वयंचलित हवामान केंद्रांच्या देखभाल आणि दूरुस्तीसाठी स्कायमेट संस्थेद्वारे स्वतंत्र इंजिनियरची नेमणूक करण्यात आलेली आहे. स्वयंचलित हवामान यंत्रात काही बिघाड झाल्यास इंजिनिअर मार्फत वेळीच दूरूस्ती करण्यात येते.

सद्य:स्थितीत जालना जिल्ह्यात उभारण्यात आलेली सर्व हवामान केंद्रे सुस्थितीत कार्यरत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मंठा (जि.जालना) येथील शेतशिवारात जंगली व हिंस्त्र प्राण्याच्या वावरामुळे शेतकरी व त्यांचे कुटूंबियांच्या जीवाला धोका असल्याबाबत

**(९) ७३१५ (२५-०३-२०२६) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले : तारांकित प्रश्न क्रमांक ४९६ ला दिनांक १० मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंठा (जि.जालना) या विभागातील शेतशिवारात मागील काही वर्षापासून जंगली व हिंस्त्र प्राण्याचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असून यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी होत असून रोही, जंगली वराह, हरीण,वानर तसेच बिबटयांच्या वाढत्या उपद्रवामुळे तेथील शेतकरी, नागरिक भयभित झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन होणारा वन्यप्राण्यांचा उपद्रव रोखण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२७-०४-२०२६) :** (१) ता.मंठा, जि.जालना हा तालुका छत्रपती संभाजीनगर या वनविभागाच्या अंतर्गत येत असून येथील शेतशिवारात मागील तीन वर्षापासून वन्यप्राण्यांचा उपद्रवामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसानीची प्रकरणे व शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या नुकसान भरपाईचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

| सन | शेतपीक नुकसान प्रकरणांची संख्या | अदा करण्यात आलेली नुकसान भरपाई (रुपये मध्ये) |
|---|---|---|
| २०२३-२४ | २१३७ | ८०,०६,४९०/- |
| २०२४-२५ | ३३१८ | २,०६,१३,९२१/- |
| २०२५-२६ | १६६८ | ६६,७६,४०९/- |

(२) वन्यप्राण्यांचा उपद्रव रोखण्याकरीता वनविभागामार्फत वेळोवेळी उपद्रवी माकड/वानर यांना पकडून नैसर्गिक अधिवासात सोडण्याची कार्यवाही करण्यात येते. तसेच परिसरात वन्यप्राणी बिबट आढळल्यास पिंजरे लावण्यात येतात. वेळोवेळी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरात बिबट्याचे एआय निर्मित व्हिडिओ आणि छायाचित्रांमुळे नागरिकांमध्ये भिती निर्माण झाल्याबाबत

**(१०) ७४२८ (२५-०३-२०२६) श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात बिबट्याचे एआय निर्मित व्हिडिओ आणि छायाचित्रांमुळे वेगवेगळ्या भागातील

नागरिकांना भयभीत करण्याचा प्रकार माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आला असून पुण्यातील राम नदीपात्रालगत बिबट्या असल्याच्या बातमीने नागरिकांमध्ये भिती निर्माण झाली आहे मात्र,ही अफवा असल्याचे वन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने असे एआय निर्मित व्हिडिओ आणि छायाचित्र तयार करून नागरिकांमध्ये भिती निर्माण करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२७-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.

पुणे वनविभागाकडून स्थानिक वर्तमानपत्रातुन या अफवांबाबत जनजागृती करुन नागरिकांना अफवांवर आणि एआय निर्मित व्हिडिओ व छायाचित्रांवर विश्वास ठेऊ नये असे आवाहन करण्यात आले होते.
(२) उक्त प्रकरणी पुणे वनविभागाकडून चौकशी करुन काही आरोपींना ताब्यात घेण्यात आलेले होते. त्यांची चौकशी करुन त्यांचेकडून पुन्हा असे कृत्य होणार नाही याबाबत दक्षता घेण्याची सक्त ताकिद त्यांना देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## फलोत्पादन मंडळाच्या अखर्चित निधीबाबत

**(११) ७७७२ (२५-०३-२०२६) श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक ३ ऑक्टोबर, २०२५ रोजी कृषी विभागाने फलोत्पादन मंडळ बंद करुन तीन महिन्यांच्या आत सर्व कामकाज व मंडळातील कंत्राटी कर्मचारी तसेच सर्व स्थावर आणि जंगम मालमत्ता फलोत्पादन विभागाकडेच वर्ग करण्याचे आदेश दिल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फलोत्पादन मंडळाला मिळालेल्या एकूण १३६ कोटी निधीपैकी ६८ कोटी रुपये वापरले गेले असून उर्वरित प्राप्त झालेला ६८ कोटीचा निधी खर्च करण्याचा कायदेशीर अधिकार असलेले अधिकारी फलोत्पादन मंडळ बंद झाल्याने कार्यमुक्त झाले असून नव्या अधिकाऱ्यांना अद्याप निधी खर्च करण्याचे अधिकार मिळालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, फलोत्पादन मंडळ बंद करताना सारे कामकाज सध्याच्या फलोत्पादन विभागातील अधिकाऱ्यांना नेमून दिले असून निधीदेखील वेळेत खर्च करण्याचे नियोजन सुरु असल्यामुळे निधी अखर्चित राहणार नाही असे कृषी संचालक,फलोत्पादन विभाग यांच्याकडून सांगण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन फलोत्पादन मंडळाला मिळालेल्या एकूण १३६ कोटी निधीपैकी अखर्चित असलेल्या उर्वरित ६८ कोटीचा निधी खर्च करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही

केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले (०२-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) सन २०२५-२६ आर्थिक वर्षात एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानासाठी केंद्र व राज्य शासनाचे मिळून एकत्रित रुपये १३६.६७ कोटी निधी वितरित करण्यात आला होता त्यापैकी रुपये १२५ कोटी निधी खर्च झाला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सूक्ष्म सिंचन क्षेत्रातील घसरण रोखण्यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याबाबत

**(१२) ७८११ (२५-०३-२०२६) श्री.पंकज भुजबळ, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २००० मध्ये सूक्ष्म सिंचन क्षेत्रात देशात ६० टक्के वाट्यासह अग्रस्थानी असलेले महाराष्ट्र राज्य, मागील सहा वर्षांत ११ टक्क्यांवर येऊन पाचव्या क्रमांकावर आले असून गुजरात, कर्नाटक, तमिळनाडू आणि आंध्र प्रदेश यांसारख्या राज्यांनी महाराष्ट्राच्या तुलनेत या क्षेत्रात अधिक वेगाने प्रगती केली असून सन २०२५-२६ च्या मंजूर १७७५ कोटी रुपयांच्या कृषी विकास आराखड्यापैकी सूक्ष्म सिंचनासाठी ५९६ कोटींची तरतूद असूनही, केंद्र सरकारने मूळ आराखड्यात ७१ कोटींची कपात केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत संचाचे पूर्ण शुल्क आधी भरावे लागत असल्याने, आर्थिक टंचाईमुळे अनेक अल्पभूधारक शेतकरी या योजनेपासून वंचित राहत असून लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पत्राद्वारे सूक्ष्म सिंचन योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कृषी आयुक्तालय, पुणे येथे स्वतंत्र ‘सूक्ष्म सिंचन विभाग’ निर्माण करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील पत्राच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीच्या दृष्टीने स्वतंत्र विभाग निर्मितीच्या प्रस्तावाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (१३-०५-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०२५-२६ करीता प्रति थेंब अधिक पीक या योजनेंतर्गत सूक्ष्मसिंचन या घटकासाठी रुपये ५९६.५८ कोटी रक्कमेस वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी केंद्र शासनाकडून प्राप्त व राज्य शासनाकडून समरूप हिश्श्यापोटी रुपये ५६२.४६ कोटी निधी वितरीत करण्यात आला होता.सदर वितरीत निधीपैकी रुपये ५२१.३१ कोटी निधीचे दावे (claims) दिनांक २५/०३/२०२६ पर्यंत RBI बँकेस सादर करण्यात आले होते. परंतु केंद्र शासनाकडून रुपये ११.१४ कोटी रक्कमेचे दावे

फेटाळण्यात (claims rejected) आले असल्याने फक्त रुपये ५१०.१७ कोटी निधी खर्च झाला आहे.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थी उपलब्ध नसल्याने रुपये ४१.१५ कोटी इतका शिल्लक निधी समर्पित करण्यात आलेला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

लोकप्रतिनिधींनी दिनांक ०७/०४/२०२५ च्या पत्रान्वये आयुक्त (कृषी) यांना "सूक्ष्म सिंचन विभाग" या स्वतंत्र कक्षाची मागणी केली आहे.

(३) मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना ही प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना - प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन योजना) या योजनेची पूरक योजना असून, सदर योजना कृषी आयुक्तालय स्तरावर संचालक (फलोत्पादन) यांच्या अधिनस्त आहे. सदर योजना सूक्ष्म सिंचन शाखेंतर्गत स्वतंत्रपणे राबविण्यात येत आहे. त्यानुसार कृषी आयुक्तालयाच्या दिनांक ३०/०५/२०२५ च्या पत्रान्वये लोकप्रतिनिधींना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वन्यजीव बचाव पथकांसाठी जाहीर केलेला निधी तातडीने वितरित करणेबाबत

**(१३) ८१०१ (२५-०३-२०२६) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन्यजीवांशी संबंधित घटनांमध्ये तातडीने मदत, बचाव व उपचार करता यावेत यासाठी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास वन्यजीव बचाव पथकांसाठी विशेष निधी वितरित करण्याची घोषणा करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत वन्यजीव बचाव केंद्रे, रेस्क्यू टीम्स व ट्रस्ट उपचार केंद्रांना आवश्यक निधी प्रत्यक्षात वितरित करण्यात आलेला नसल्यामुळे बचाव साहित्य, औषधे, वाहने व मनुष्यबळाच्या अभावामुळे बचाव कार्यात अडचणी येत असून निधी वितरणात विलंब झाल्यामुळे जखमी अवस्थेतील वन्यजीवांच्या उपचारास उशीर होणे, बचाव कार्य अपूर्ण राहणे व संबंधित स्वयंसेवी संस्था व पथकांवर आर्थिक ताण येत असल्याने शासनाच्या घोषणांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास जाहीर केलेल्या निधीपैकी आतापर्यंत किती निधी वितरित करण्यात आला असून किती निधी अद्याप प्रलंबित आहे, तसेच जिल्हानिहाय वन्यजीव बचाव पथकांना प्रत्यक्ष किती निधी देण्यात आला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्या अनुषंगाने सदरहू निधी तातडीने वितरित करून वन्यजीव बचाव पथकांची क्षमता वाढविण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही व उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (१२-०५-२०२६) :** (१) पुणे वनवृत्तातील पुणे वनविभागांतर्गत दौंड, पुणे, बारामती, भोर, पुरंदर तसेच जुन्नर वनविभागांतर्गत जुन्नर, शिरुर, खेड व आंबेगाव या तालुक्यामध्ये बिबट्याचा

खाजगी व मालकी क्षेत्रामध्ये तसेच शेत वस्ती नजीक वावर असल्याने, वारंवार मानव-बिबट संघर्षाची तीव्र परिस्थिती निर्माण झाल्यामुळे माहे डिसेंर २०२५ वा त्यादरम्यान जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मानव-बिबट संघर्ष टाळण्याकरीता वन्यप्राणी पिंजरे व आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

राज्य योजना अंतर्गत पुणे वनवृत्तातील पुणे वनविभागांतर्गत १२ वनपरिक्षेत्रामध्ये व जुन्नर वनविभागांतर्गत नारायणगाव, आळे, नगदवाडी, पिंपरखेड, न्हावरा, गावडेवाडी व कोरेगाव भिमा येथे वनपरिक्षेत्रनिहाय ७ बिबट बेस कॅम्प कार्यान्वित असून, सदर बेस कॅम्प मधील शीघ्र बचाव दल सदस्य तसेच क्षेत्रिय अधिकारी कर्मचारी यांचेमार्फत व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

(२) व (३) पुणे वनवृत्तातील पुणे वनविभागाकिरता जिल्हा वार्षिक योजना ग्रामपरिसर व आदिवासी विकास कार्यक्रम २४०६ ५७९५ अंतर्गत साहित्य खरेदी, पिंजरे खरेदी करणेकामी रुपये १०९.१९ लक्ष चा प्रस्ताव जिल्हाधिकारी, जिल्हा नियोजन समिती, पुणे यांचेकडे सादर करण्यात आला असून रुपये ५७.०० लक्ष निधीची प्रशासकीय मंजुरी प्राप्त असून, रुपये ५६.३० लक्ष इतका निधी प्राप्त झालेला आहे. जुन्नर वनविभागाकरीता जिल्हा वार्षिक योजना ग्रामपरिसर व आदिवासी विकास कार्यक्रम २४०६ ५७९५ अंतर्गत २० चमूची स्थापना करणे, साहित्य खरेदी, वाहन खरेदी, पिंजरे खरेदी करणेकामी रुपये ११२५.०० लक्ष निधीची प्रशासकीय मंजुरी प्राप्त असून, निधी वितरणाबाबत कार्यवाही सुरू आहे. तसेच सोलापूर वनविभागांतर्गत मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी प्राथमिक बचाव पथक स्थापन करण्यासाठी रुपये २६.४० लक्ष रक्कमेचा प्रस्ताव तसेच औषधे व मनुष्यबळ पुरवठ्यासाठी निधी मागणीचा रुपये ६३६.७५ लक्ष रक्कमेचा प्रस्ताव प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर केला असून निधी वितरणाबाबत कार्यवाही सुरू आहे.

मानव-बिबट संघर्षाच्या अनुषंगाने वनकर्मचारी व रेस्क्यु सदस्यांमार्फत संवेदनशील क्षेत्रामध्ये व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. तसेच आवश्यक त्या ठिकाणी पिंजरे लावून बिबट जेरबंद करण्यात येत आहेत. तसेच शाळांमध्ये जनजागृती व्यापक स्वरुपात कार्यशाळा घेण्यात येत आहेत. बिबट कृती दलामार्फत गस्ती करण्यात येत आहे. तसेच वन्यप्राणी बचाव केंद्र मौ-बावधन, पुणे व माणिकडोह बिबट निवारा केंद्र, जुन्नर येथे वन्यप्राणी बचाव केंद्र तसेच वन्यप्राण्यांसाठी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल कार्यरत असून तेथे जखमी अवस्थेतील वन्यजीवांना योग्य उपचार करुन निसर्ग मुक्त करण्यात येत आहे.

(४) व (५) जिल्हा वार्षिक योजना व राज्य योजनांतर्गत सादर करण्यात आलेला निधी मागणी प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

---

## राज्यात विवाह नोंदणी प्रक्रिया सुलभ व पारदर्शक करणेबाबत

**(१४) ८१२८ (२५-०३-२०२६) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विवाह नोंदणीसाठी अर्ज, प्रतिज्ञापत्रे, कागदपत्रांची पूर्तता, प्रतीक्षा कालावधी व विविध शुल्क यामुळे नागरिकांवर आर्थिक व प्रशासकीय भार वाढत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली असून विवाह नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या प्रतिज्ञापत्रे, स्टॅम्प शुल्क, दस्तऐवजांची छायांकित प्रती व इतर प्रक्रियात्मक खर्चामुळे पंधराशे रुपयांपेक्षा अधिक खर्च येत असून

यामुळे सामान्य व अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विवाह नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रतीक्षा कालावधी जास्त असल्याने तसेच कार्यालयीन कामकाजाच्या मर्यादांमुळे नागरिकांना वारंवार कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत असून वेळ व पैशांचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विवाह नोंदणी प्रक्रियेत आवश्यक कागदपत्रांची संख्या कमी करणे, ऑनलाईन पध्दती अधिक सुलभ करणे तसेच एकाच ठिकाणी सर्व सेवा उपलब्ध करून देण्याबाबत शासन स्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०२६) : (**१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील 'कृषी समृद्धी' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्याबाबत

**(१५) ८१६८ (२५-०३-२०२६) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कृषी विभागाने सुरू केलेल्या 'कृषी समृद्धी' योजनेला निधी अभावी अवघ्या पाच महिन्यात स्थगिती देऊन नवे प्रस्ताव स्वीकारणे बंद करण्याचे आदेश माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे जुलै, २०२५ मध्ये जाहीर झालेल्या या योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्याकरीता १५ कोटी रुपयांच्या निधीचे नियोजन करण्यात आले होते, परंतु प्रत्यक्षात निधी उपलब्ध न झाल्याने शेतकरी उत्पादक कंपन्या आणि बाजार समित्यांचे शेतमाल साठवणुकीसाठीचे शेड उभारण्याचे व मूल्यवृद्धीचे महत्त्वाचे प्रकल्प प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, १ रुपया पीक विमा योजनेच्या वाचलेल्या निधीतून ही योजना राबवण्याचे आश्वासन शासनाने दिले असताना अद्याप निधीअभावी योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होऊ शाकली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी प्रलंबित असलेल्या प्रस्तावांसाठी निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात तसेच भविष्यात अशा योजना राबवताना निधीची आगाऊ तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (०३-०६-२०२६) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने कृषी समृध्दी योजना राबविण्यास मान्यता दिली आहे.

सन २०२५-२६ या वर्षात सदर योजनेकरीता अर्थसंकल्पिय तरतूद उपलब्ध झाली नव्हती.

मात्र, सदर योजनेच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्मिती, शेतीसाठी येणाऱ्या उत्पादन खर्चात कपात, उत्पादकतेत वाढ, पीक विविधीकरण, मूल्य साखळीचे बळकटीकरण आणि हवामान अनुकूल आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन इत्यादी बाबींची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात सदर योजनेच्या अंमलबजावणीकरीता रुपये २००० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे.

सन २०२६-२७ या वर्षामध्ये सदर योजनेची विस्तृत अंमलबजावणी करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतकरी उत्पादक संस्थां (एफपीओ) सक्षम करून त्यांची आर्थिक शाश्वतता वाढविणेबाबत

**(१६) ८२६६ (०२-०३-२०२६) डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकरी उत्पादक संस्थांची (एफपीओ) संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून अनेक एफपीओंना भांडवलाची कमतरता, कार्यकारी व्यवस्थापनातील अडचणी, बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच नसणे, साठवणूक, प्रक्रिया, वाहतूक व विक्री व्यवस्थेतील मर्यादा व व्याज सवलत, पतपुरवठा, प्रक्रिया उद्योगाशी जोडणीचा अभाव इ.मुळे अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून मित्रा' उपक्रमांतर्गत एफपीओंसाठी नवीन धोरण जाहीर करण्याची प्रक्रिया देखील प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, राज्यातील अनेक एफपीओंचा कारभार बंद पडण्याच्या किंवा निष्क्रिय होण्याच्या स्थितीत असल्याने शासनाच्या विविध योजनांतर्गत दिलेला निधी, प्रशिक्षण व सहाय्य साधनांचा योग्य व प्रभावी वापर होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, एफपीओंना दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य मिळावे यासाठी ‘मित्रा’ उपक्रमांतर्गत धोरणात आवश्यक सुधारणा करून स्वतंत्र, कालबध्द कृती आराखडा राबविण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (१२-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

आर्थिक सल्लागार परिषदेच्या शिफारशींच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील शेतकरी उत्पादक संस्था (FPO) सक्षम करण्यासाठी शेतकरी उत्पादक संस्था धोरण २०२६-२०३१ तयार करण्यासाठी मित्रा कृषी विभागास सहाय्य करीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राज्य शासनाने राज्याचे आर्थिक धोरण निश्चित करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषद नेमली होती.

सल्लागार परिषदेने सुचविलेल्या बाबी, शिफारस लक्षात घेऊन आवश्यक धोरण तयार करण्याच्या दृष्टीने मित्र संस्था कृषी विभागास सहाय्य करीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोलामार्का संवर्धन राखीव क्षेत्राला (जि.गडचिरोली) अभयारण्याच्या दर्जा देण्याबाबत**

**(१७) ८३६३ (२५-०३-२०२६) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोलामार्का हे क्षेत्र दुर्मिळ 'आशियाई रानम्हशींसाठी' प्रसिध्द असून कोलामार्का संवर्धन राखीव क्षेत्रातील रानम्हशीच्या संरक्षणाकरीता या क्षेत्राला अभयारण्याचा दर्जा दिल्यास या प्राण्यांच्या प्रजननासाठी आणि वाढीसाठी एक सुरक्षित 'कॉरिडॉर' निर्माण होवून रानम्हशींच्या संवर्धनासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून विशेष निधी आणि तांत्रिक मदत मिळणे सोपे होणेकरीता गडचिरोली जिल्ह्यातील कोलामार्का संवर्धन राखीव क्षेत्रातील रानम्हशीच्या संरक्षणाकरीता या क्षेत्राला अभयारण्याचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याकरीता स्वतंत्र निधी, कडक संरक्षण व्यवस्था शास्त्रीय पध्दतीने निरीक्षक आणि अधिवास सुधारणा याकरीता लागणारा निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदरहू निधी किती कालावधीत उपलब्ध होणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२७-०४-२०२६) :** (१), (२) व (३) राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक ०६/०६/२०२२ रोजी संपन्न झालेल्या १८ व्या बैठकीमध्ये गडचिरोली जिल्ह्यातील कोलामार्का क्षेत्राला अभयारण्य म्हणून अधिसूचित करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे.

तथापि, राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक ०६/०१/२०२६ रोजी संपन्न झालेल्या २५ व्या बैठकीमध्ये गडचिरोली जिल्ह्यातील कोलामार्का क्षेत्राचा अभ्यास करून अहवाल सादर करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले आहेत.

---

**मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी यांना महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचे आदेशानुसार सेवा ज्येष्ठता देणेबाबत**

**(१८) ८३८० (२५-०३-२०२६) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी सेवा ज्येष्ठतेबाबत 'महाराष्ट प्रशासकीय न्यायाधिकरण. मुंबई' येथे दाखल केलेला मूळ अर्ज क्रमांक २०८, २०९ व २०१०/२०१६ प्रकरणी न्यायाधिकरणाने दिनांक ०५ मार्च, २०१९ रोजी आदेश पारीत केलेल्या आदेशानुसार विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी शासनास सादर केलेल्या अहवालानुसार शासन पत्र महसूल व वन विभाग दिनांक १७ फेब्रुवारी, २०२३ अन्वये शासनाने महसूल अर्हता परीक्षेबाबत निर्णय घेतलेला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णयानुसार संबंधित अधिकारी /कर्मचारी यांना विभागीय स्तरावर ज्येष्ठता सुची मध्ये पदोन्नतीच्या प्रत्येक टप्प्यावर मानीव दिनांक देणेबाबत विभागीय कोकण आयुक्त, कोकण विभाग यांनी दोन वर्षे लोटली तरी अद्यापही कोणताही निर्णय घेतला नसल्याची बाब दिनांक २७ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित अधिकारी /कर्मचारी यांनी विभागीय स्तरावर ज्येष्ठतेच्या सूचीमध्ये प्रत्येक टप्प्यावर मानीव दिनांक मिळणेबाबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रतीसह विनंती अर्ज करुनही व महाराष्ट प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई यांचेकडील आदेश सुस्पष्ट असताना ही अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले असून जिल्हाधिकारी मुंबई शहर कार्यालयातील कर्मचारी यांना महाराष्ट प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई यांचे आदेशानुसार तातडीने सेवा ज्येष्ठता देणेबाबत (मानीव दिनांक मिळणेबाबत) शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०५-०५-२०२६) :** (१) महसूल व वन विभाग, शासन पत्र दिनांक १७/०२/२०२३ अन्वये, सामान्य प्रशासन विभागाने दिलेले अभिप्राय विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना कळविण्यात आले आहे.
(२), (३) व (४) शासन पत्र दिनांक २४/०३/२०२६ अन्वये, जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयातील ०८ सहाय्यक महसूल अधिकारी यांना पदोन्नतीच्या पदावर रूजू झाल्याचा दिनांक हा मानीव दिनांक म्हणून अनुज्ञेय ठरत नाही असे अभिप्राय विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना कळविण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धाराशिव जिल्ह्यातील विविध प्रकरणांमध्ये उपजिल्हाधिकारी, धाराशिव यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील धोरणांचे उल्लंघन केल्याबाबत

**(१९) ८४४४ (२५-०३-२०२६) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव जिल्ह्यातील प्रकरण क्र. ५८/B/२००३/O/कावी या फेरविचार याचिकेप्रकरणी महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, संभाजीनगर यांनी दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी उपजिल्हाधिकारी (भूसुधार), धाराशिव यांच्याकडे वादग्रस्त जमिनीवरील 'कुळ'त्व निश्चित करण्यासाठी प्रकरण सुपूर्द केले होते, तरी सुद्धा उपजिल्हाधिकारी यांनी संबंधित चौकशी प्रक्रिया पूर्ण न करता दिनांक २८ जून, २०२४ रोजी इतर वारसांना 'संरक्षित कुळ' म्हणून जाहीर केल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित निर्णयानंतर तहसिल व दुय्यम निबंधक कार्यालयात तातडीने फेरफार करून मालकी हक्काचे दाखले नोंदविले गेले असून, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या धोरण तसेच महसूल आयुक्तांचे परिपत्रक यांचे उल्लंघन करण्यात आलेले असून सदर प्रकरणात अर्जदारांकडून लेखी युक्तिवाद व पुरावे सादर करूनही एकतर्फी निर्णय देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तद्नुषंगाने अन्यायग्रस्तांनी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, जिल्हाधिकारी, धाराशिव यांचेकडे निवेदनाद्वारे तक्रार करुनही अद्यापही कोणतीच कारवाई केली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने अशा प्रकारच्या गैरप्रकारांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करुन अन्यायग्रस्तांना न्याय देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०८-०६-२०२६) :** (१) हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९५० चे कलम ९० नुसार दाखल झालेल्या अर्धन्यायिक प्रकरणात उपजिल्हाधिकारी, धाराशीव यांनी दिनांक २८/०६/२०२४ रोजी निकाल पारीत केला आहे. सदर आदेशाविरुध्द उपप्रबंधक, महाराष्ट्र न्यायाधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे रिव्हीजन अर्ज दाखल केला आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रस्तुत प्रकरणात उपजिल्हाधिकारी यांच्या आदेशाविरुध्द करण्यात आलेल्या तक्रारींची चौकशी करण्यात आली असून तक्रारी तथ्य नसल्याने तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. तथापि, दिनांक २८/०६/२०२४ रोजीच्या आदेशाविरुध्द उपप्रबंधक, महाराष्ट्र न्यायाधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे रिव्हीजन अर्जावर कार्यवाही सुरु आहे.

---

## चाळीसगाव (जि.जळगाव) येथे स्वतंत्र अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्याबाबत

**(२०) ८४५१ (२५-०३-२०२६) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (जि.जळगाव) येथे स्वतंत्र अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपर जिल्हाधिकारी कार्यालय चाळीसगाव अंतर्गत जिल्ह्यातील कोणत्या तालुक्यांचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव व शासनास सादर करण्यात आला आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चाळीसगावात स्वतंत्र अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन होणे संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२३-०४-२०२६) :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे. अपर जिल्हाधिकारी कार्यालय निर्मितीबाबतचे प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयाकडून शासनास प्राप्त झाले असून याअनुषंगाने शासनस्तरावर नियमोचित कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.